
संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधीने केलेल्या २००६-२००७ अभ्यासानुसार ११६७ स्त्रियांपैकी एका स्त्रीला फिस्टुलाचा आजार दिसून आला. काही तज्ज्ञांच्या आणि डॉक्टरांच्या मते बाळंतपणाच्या सेवा सुविधांचा प्रसार झाल्याने या आजाराचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. परंतु जिथे अशा कुशल सुविधा नाहीत तिथे मात्र हा आजार होण्याची शक्यता अजूनही आहे. तसंच या आजारामुळे होणारे त्रास हे गंभीर असल्याने व त्यावर शस्त्रक्रियेची सुविधा सहज उपलब्ध नसल्याने त्याबद्दल माहिती देणे अधिक गरजेचे आहे.

### फिस्टुलाचं प्रमाण :

जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार सध्या जगभरात सुमारे २० लाख स्त्रिया फिस्टुलाचा त्रास सहन करत आहेत असा अंदाज आहे. आफ्रिका आणि अशिया खंडामध्ये गरीब स्त्रियांमध्ये ही समस्या अतिशय तीव्र स्वरूपात आढळून येते. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये फिस्टुला हा आजार जास्त आढळतो.




## कौटुंबिक पातळीवर उपाय योजना

- ✓ मुलीचा विवाह किमान १८ वर्षाच्या नंतर करावा, मूल लवकर होण्यासाठी मुलीवर दबाव आणू नये. मुलीला शिक्षण पूर्ण करण्याची संधी देणं आवश्यक आहे.
- ✓ गरोदर बाईला पुरेशी विश्रांती व सकस आहार मिळाला पाहिजे. सरकारी दवाखान्यात तपासणीसाठी घेऊन गेलं पाहिजे. तिच्यासोबत जायला हवं.
- ✓ बाळंतपणासाठी आवश्यक ती तयारी करणे, उदा. सुस्थितीतील वाहनाची व्यवस्था करणे, वैद्यकीय खर्चासाठी आवश्यक ती पैशाची तरतूद करून ठेवणे.
- ✓ एखाद्या बाईला फिस्टुलाचा आजार असल्यास तिला आधार द्यावा. आरोग्यसेवांपर्यंत पोचवण्यासाठी प्रयत्न केले जावेत.

## फिस्टुलावर धोरणात्मक उपाय योजना

- ✓ शासनाने बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रभावी व कार्यक्षमपणे अंमलबजावणी करावी.
- ✓ उपकेंद्रामध्ये प्रसूतीची सोय असायला हवी. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रसूतीची सेवा २४ तास उपलब्ध असावी. ग्रामीण रुग्णालयामध्ये सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक सेवा सुविधा उपलब्ध असाव्यात.
- ✓ घरी अथवा दवाखान्यात होणाऱ्या बाळंतपणादरम्यान प्रशिक्षित आरोग्यसेविका (दाई,एएनएस, नर्स) सोबत असावी.
- ✓ प्रसूतीपश्चात सेवांमध्ये फिस्टुलासाठी तपासणीचा समावेश केला जावा. बाळंतपण अवघड गेलं असल्यास ही तपासणी निश्तिपणे करण्यात यावी. विशेषकरुन ग्रामीण आणि दुर्गम भागात परिचारिकांना त्यासंबंधीचे प्रशिक्षण देण्यात यावे व लवकरात लवकर शस्त्रक्रियेसाठी संदर्भसेवेकडे पाठवावे.
- ✓ सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये फिस्टुलावरील शस्त्रक्रियेची सोय असावी.
- ✓ गावपातळीवर संदर्भ सेवांपर्यंत पोचण्यासाठी वाहनाची आणि प्रवासनिधीची तरतूद. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनअंतर्गत निधीचा योग्य वापर.

**याविषयी अधिक माहितीसाठी** - १. मैत्री आरोग्याशी स्त्रिया आणि आरोग्य संवाद पुस्तक, तथापि व माविम प्रकाशन
२. व्हेअर विमेन हॅव नो डॉक्टर, हेस्पेरियन प्रकाशन, जून १९९७
३. www.endfistula.org

**तथापि** हे स्त्रिया आणि आरोग्यसंबंधीचे संसाधन केंद्र आहे. आरोग्याची माहिती मिळावी, लोकाभिमुख आणि स्त्री केंद्री दृष्टिकोन तयार व्हावा यासाठी मराठी व इंग्रजीमध्ये पुस्तिका, फ्लिपचार्ट, प्रतिकृती आणि माहितीपत्रक यासारखी प्रशिक्षणासाठी वापरता येणारी साधनं तयार करून वितरित करणे तसेच महाराष्ट्रातील इतर संस्थांमधील संसाधने संकलित करणे व ती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम तथापि करते.

सध्या तथापि स्त्रियांच्या दृष्टिकोनातून आरोग्य प्रशिक्षण आणि समर्थनाचे काम करीत आहे. गावपातळीवर कार्यरत असणाऱ्या गटांना आवश्यक, उपयुक्त आणि योग्य अशी माहिती व संसाधने उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असतो. आपल्या हक्कांच्या सरकारी आरोग्य सेवांचा आपण जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि अशास्त्रीय उपचारांना विरोध करावा यासाठी हे माहितीपत्रक तयार करण्यात आले आहे.

**साद आरोग्याची** या माहितीपत्रकाच्या (Factsheet) मालिकेमध्ये काही निवडक गंभीर आजारांची स्त्रियांच्या दृष्टीकोनातून माहिती दिली जाणार आहे. हृदयरोग, कर्करोग, क्षयरोग यासारख्या गंभीर आजारांचे स्त्रियांवरही परिणाम होतात. स्त्रियांमधील अशा आजारांचं प्रमाण, लक्षणे, उपाययोजना याची थोडक्यात माहिती देणारी माहितीपत्रकांची मालिका तथापि प्रकाशित करत आहे. यात एकूण १२ पत्रकं असतील.

**फिस्टुला** (Obstetric Fistula) हा आशिया आणि आफ्रिका खंडातील गरीब स्त्रियांमध्ये आढळणारा एक गंभीर आजार आहे. प्रसूतीच्या सेवा वेळेत न मिळाल्याने प्रजननमार्गामध्ये फट तयार होते आणि त्यातून लघवी अथवा शौचाचे कण सतत येत राहतात. या आजाराचं प्रमाण आता कमी झालं असलं तरी ज्यांना हा त्रास होतो त्यांना खूप वेदना आणि अवहेलना सहन करावी लागते. त्यामुळे त्याची माहिती घेणं गरजेचं आहे. या दुर्लक्षित आजाराबद्दल माहिती घेतल्याने आपण या विषयी जागृती निर्माण करु शकू तसंच असा आजार असणाऱ्या स्त्रियांना आरोग्यसेवांपर्यंत पोचवू शकू.


तथापि ट्रस्ट
४२५, डी. पी. ७७ टि.म.वि. कॉलनी, मुकुंद नगर, पुणे, ४११०३७
दूरध्वनी : ०२० - २४२६०२६४/२४२६७९०८
इमेल : tathapi@gmail.com, tathapi@tathapi.org



**संकल्पना :** ऑड्री फर्नांडिस **लेखन :** मनीषा बुद्धीवंत, मेधा काळे **डिझाईन : संस्कृती डिझायनर्स**

**आभार :** पत्रकावरील सूचनांसाठी डॉ. आनंद भालेराव, विभागप्रमुख, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र, ससून सर्वोपचार रुग्णालय आणि डॉ. प्रतिभा कुलकर्णी यांचे आभारी आहोत.

**देणगी मूल्य :** रु. १५ फक्त **जुलै २०१०**

तथापिला सर जे आर डी टाटा ट्रस्ट, मुंबई यांचे अर्थसहाय्य मिळते.


साद आरोग्याची ४

# प्रजनन मार्गाचा फिस्टुला

## फिस्टुला म्हणजे काय


फिस्टुला म्हणजे नको त्या ठिकाणी फट अथवा भोक तयार होणे. स्त्रियांमध्ये योनिमार्गामध्ये फिस्टुला होण्याची शक्यता असते. बाळंतपण अडलं असल्यास किंवा खूप जास्त जोर देऊनही बाळ बाहेर न आल्यास योनिमार्गाची भिंत आणि मूत्राशयाच्या भिंतीमध्ये फट किंवा भोक पडून लघवी योनिमार्गातून बाहेर येऊ लागते. कधी कधी गुदाशयाच्या त्वचेला भोक पडून शौचाचे कण योनिमार्गातून बाहेर येऊ लागतात, या आजाराला फिस्टुला असे म्हणतात.

## फिस्टुला का होतो ?

- बाळंतपणासाठी किंवा प्रसुतीसाठी तात्काळ आरोग्य सेवा न मिळणं हे सर्वात महत्वाचे कारण आहे. सेवा उपलब्ध नसणं किंवा गरिबीमुळे सेवांचा लाभ घेता न येणं यामुळे बाळंतपणात अडचणी येऊ शकतात.
- मुलीचं लहान वयात लग्न व लवकर बाळंतपण आणि मुलीच्या शरीराची पुरेशी वाढ न झाल्याने. कुपोषण आणि गरिबीमुळे मुलीच्या शरीराची वाढ पुरेशी होत नाही. कमी उंचीमुळे बाळंतपण जोखमीचं ठरतं. त्यामुळे बाळंतपण अडण्याची किंवा अवघड होण्याची शक्यता जास्त असते.
- असुरक्षित गर्भपातामध्ये योनिमार्गाला इजा होण्याची शक्यता असते. बहुतेक स्त्रियांना गर्भपातासाठी सुरक्षित आणि संवेदनशील सेवा मिळत नाहीत. गर्भपाताच्या असुरक्षित पद्धतींमध्ये योनिमार्गाच्या भिंतीला इजा होण्याची शक्यता असते.
- बलात्कार व लैंगिक शोषणातून योनीमार्गाला इजा, गंभीर दुखापत
- प्रजननमार्गाचा कर्करोग व रेडिएशन

## फिस्टुलावर वैद्यकीय उपचार

- शस्त्रक्रियेशिवाय इतर उपाय नाहीत. जिथे फट पडली आहे ती जागा शस्त्रक्रिया करुन बंद केली जाते.
- मूत्राशय किंवा गुदाशयामध्ये जिथे फट पडली असेल त्या ठिकाणी टाके घालून शस्त्रक्रिया केली जाते.
- ही शस्त्रक्रिया कुशल तज्ञांमार्फत केली जाते. हया शस्त्रक्रियेसाठी सरकारी दवाखान्यात साधारणपणे १००० ते २००० रूपये इतका खर्च येतो. ही शस्त्रक्रिया जिल्हा रुग्णालयात करण्यात येते.
- शस्त्रक्रियेपूर्वी तपासण्यामध्ये एक्स रे,सोनोग्राफी इ. करणे आवश्यक आहे.
- जास्त गुंतागुंत नसणाऱ्या स्त्रियांसाठी शस्त्रक्रिया ९० % यशस्वी ठरते. इतर काही गुंतागुंत असल्यास हाच दर ६० % इतका आहे.




## शस्त्रक्रियेनंतर घ्यावयाची काळजी

- शस्त्रक्रिया झाल्यानंतर आठ दिवस पूर्ण विश्रांती घेणे गरजेचे आहे.
- टाके काढल्यानंतर साधारणपणे पंधरा दिवसांनी डॉक्टराकडे तपासणीसाठी जाणे आवश्यक असते.
- जर काही कारणामुळे शस्त्रक्रि या करणं शक्य नसेल तर एक नळी (catheter) मूत्रमार्गातून मूत्राशयात बसवली जाते, यामुळे लघवी बाहेर पडायला मदत होते.

## फिस्टुलाची लक्षणे

- योनीमार्गात फोड,व्रण तयार होणे, त्वचेला फट पडणे.
- योनीमार्गातून लघवी सतत थेंबथेंब गळत राहणे
- योनिमार्गातून शौचाचे कण येत राहणे.
- सततच्या लघवीमुळे वास,जळजळ किंवा आग होणे.
- खाज सुटणे.

## फिस्टुला होऊ नये म्हणून उपाय योजना

फिस्टुला होण्यामागे अनेक सामाजिक कारणं आहेत. याशिवाय वेळेवर आरोग्यसेवा न मिळणं हे मुख्य कारण असल्यामुळे त्याबाबत उपाययोजना होणं सर्वात आवश्यक आहे.

- ✓ गरोदरपणामध्ये सरकारी दवाखान्यात नाव नोंदणी व तपासणी करावी आणि सरकारी सेवांचा लाभ सर्व स्त्रियांना मिळायला हवा.
- ✓ बाळंतपणाच्या सर्व सोयी सुविधा सर्व स्त्रियांना मोफत व नजिक उपलब्ध असाव्यात. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ असायला पाहिजेत.
- ✓ सरकारी दवाखान्यात जाण्यास वाहनाची व तातडीच्या दळणवळणाची सोय व निधी उपलब्ध असावा. ग्राम पंचायतीकडे असणाऱ्या निधीचा यासाठी वापर करता येईल.
- ✓ बाळंतपण अडल्यास त्वरित निदान आणि सिझेरियन शस्त्रक्रियेची गरज असल्यास आवश्यक सोयी सुविधा, कुशल आरोग्य सेवक उपलब्ध असाव्या.

## फिस्टुला या आजारामुळे आरोग्यावर काय परिणाम होऊ शकतात?

### शारीरिक परिणाम

- सतत लघवी अथवा शौच येत राहिल्याने योनिमार्गाला व्रण, फोड येऊ शकतात. तसंच आग किंवा जळजळ होऊ शकते. तसंच शरीरसंबंधाच्या वेळी त्रास होतो.
- लघवी जास्त होऊ नये म्हणून पाणी कमी प्यायलं जातं. यामुळे शोष व अंगातील पाणी कमी होण्याची शक्यता असते.
- जर नस दुखावली गेले असली तर पाय निकामी होऊ शकतात. चालण्यात अडथळा येतो.
- काहीच उपाय न केल्यास किडनी निकामी होण्याची शक्यता असते.

### मानसिक व सामाजिक परिणाम

- सतत लघवीला वास येत राहिल्याने स्त्री स्वत:ला कुटूंबापासून आणि समाजापासून वेगळे ठेवण्याचा प्रयत्न करते. तसंच तिला इतरांकडून समान वागणूक मिळत नाही. हयामध्ये ती एकटी पडल्याने तिला नैराश्य येते.
- स्त्रियांमध्ये नैराश्य येते. वेदना, ताण, अपमान सहन करावा लागतो. आत्मविश्वास व उत्साह राहत नाही.
- कुंटुंबातून आणि समाजातून पुरेसा आधार मिळत नाही.
- वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक पाठबळ नसल्याने
- आवश्यक सेवा मिळत नाही आणि त्रास वाढत जातो.